# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १८/०४/२०२१

# प्रेस नोट

**विषय :- रमजान महिना- २०२१ मार्गदर्शक सूचना**

**वाचा :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) आदेश क्र.उमपा/आ.का./२२८/२०२१ दिनांक १२ एप्रिल, २०२१**
**४) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.आरएलपी-०४२१/प्र.क्र.११०/ विशा-१ब दिनांक १२ एप्रिल, २०२१**

सध्या राज्यात व महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रसार होत आहे. त्या दृष्टीकोनातून योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना संकटामुळे यावर्षी सर्व धर्मीय सण, उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. यावर्षी दि. १३ किंवा १४/४/२०२१ (चंद्रदर्शनावर अवलंबून) ते दि. १३ किंवा १४/०५/२०२१ पर्यंत मुस्लिम बांधवातर्फे पवित्र रमजान महिना साजरा केला जाणार आहे. पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम समाजामध्ये मोठया संख्येने मशिदीमध्ये जाऊन सार्वजनिकरित्या नमाज अदा करण्याची प्रथा आहे. या कालावधीत मुस्लिम बांधव समाज, तरावीह व इफ्तारसाठी एकत्र येतात. त्यामुह सदर सण हा नविन वर्ष म्हणून मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. सध्या कोव्हीड-१९ च्या दुस-या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता संदर्भिय आदेश क्र. ३ दिनांक १२ एप्रल, २०२१ मधील आदेशानुसार व त्यातील मुद्दा क्र. १.२ व १३ च्या अधिन राहून यावर्षी पवित्र रमजान महिना साजरा करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.१३ किंवा १४/०४/२०२१ रोजी पासून सुरु होणा-या मुस्लीम धर्मियांच्या पवित्र रमजान महिना साजरा करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी पवित्र रमजान महिन्यात मुस्लीम बांधवांनी नियमित नमाज पठण, तरावीह तसेच इफ्तार साठी मशिदीमध्ये अथवा सार्वजनिक ठिकाणी एकत्र न येता सर्व धार्मिक कार्यक्रम आपापल्या घरातच साजरे करावेत. नमाज पठणाकरीता मशिदीत तसेच मोकळया जागेत एकत्र येऊ नये.

२. सार्वजनिक ठिकाणी एकावेळी ५ पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र न येता भौतिक अंतराचे व स्वच्छतेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पालन पवित्र रमजान महिना अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात यावा.

३. या पवित्र महिन्यात मुस्लीम बांधव ३० दिवस दररोज पहाटेपासून उपवास ठेवतात व संध्याकाळी मगरीब नमाज पुर्वी उपवास सोडतात. या सेहरी व इफ्तारच्या वेळी अनेक फळ व इतर अन्नपदार्थ विक्रेते गर्दी करण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने महापालिका प्रशासन व पोलिस प्रशासनाने याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.

४. पवित्र रमजान महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी दुवा पठण (अलविदा जुम्मा) करण्याची प्रथा आहे. त्यासाठी मुस्लीम बांधव मोठया प्रमाणात मशिदीमध्ये येऊन दुवा पठण करतात. परंतू यावेळी कोविड-१९ चा प्रादुर्भाव पाहता कोणीही मशिदीमध्ये दुवा पठणाकरिता एकत्र येवू नये. आपपल्या घरातच दुवा पठण करावे.

५. शब-ए-कदर ही पवित्र रात्र रमजान महिन्याच्या २६ व्या दिवशी साजरी करण्याची प्रथा आहे. या निमित्ताने मुस्लीम बांधव तरावीह नमाज संपल्यानंतर आपल्या विभागातील मशिदीमध्ये रात्रभर कुराण पठण व नफील नमाज अदा करतात. परंतू यावर्षी सर्व मुस्लिम बांधवांनी सदर धार्मिक कार्यक्रम आपापल्या घरात राहूनच करावेत.

६. पवित्र रमजान महिन्यात बाजारामध्ये सामान खरेदीकरिता गर्दी करु नये किंवा एकत्र जमू नये.

७. धार्मिक स्थळे बंद असल्याने वाझ कार्यक्रमांचे आयोजन शासनाच्या नियमांचे पालन करुन बंद जागेत शक्यतो ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात यावेत.

८. कोविड-१९ या विषाणूच्या अनुषंगाने फौ.दं.प्र.सं.कलम १४४ लागू असल्याने तसेच संचारबंदी असल्यामुळे फेरीवाल्यांनी रस्त्यावर स्टॉल लावू नयेत तसेच नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर फिरु नये.

९. या पवित्र रमजान महिन्यात कोणत्याही प्रकारे मिरवणूका, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अथवा राजकीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये.

१०. धार्मिक स्थळे बंद असल्याने मुस्लीम समाजातील धर्मगुरु, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून पवित्र रमजान महिना साधेपणाने साजरा करण्याच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात यावी.

११. कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष रमजान सण सुरु होण्याच्या व चालू असतानाच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्याचे देखील अनुपालन करावे.

१२. सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, कोरोना बाबत काळजी घ्यावी. त्रिसुत्र जसे नियमित भौतिक अंतर ठेवणे, मास्कचा वापर करणे, हात धुणे व सॅनिटायझरचा वापर करणे तसेच अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे पालन करावे.

तरी सर्व नागरिकांनी वरील सूचनांचे पालन करुन कोरोना आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे. उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम. १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(डॉ. युवराज भदाणे)
**माहिती व जनसंपर्क अधिकारी**
उल्हासनगर महानगरपालिका